आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
९ जून २०२६ - मंगळवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालच्या केंद्र सरकारला १२ वर्ष पूर्ण
- प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियानाला दहा वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्तानं विशेष मोहिमेचं आयोजन
- राज्यसभा निवडणुकीसाठी मध्यप्रदेशातून अर्ज भरलेल्या काँग्रेस उमेदवार मीनाक्षी नटराजन यांचा अर्ज बाद
- राजस्थानात फटाक्यांच्या गोदामात लागलेल्या आगीत ७ जणांचा मृत्यू

**आणि**

- पाकव्याप्त काश्मीरमधे झालेल्या संघर्षात ३० जणांचा मृत्यू, दोनशेहून अधिक जण जखमी

**<><><><><>**

केंद्रात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारला १२ वर्ष पूर्ण झाली. २०२४ मध्ये आजच्याच दिवशी नरेंद्र मोदी यांनी तिसऱ्यांदा प्रधानमंत्रीपदाची शपथ घेतली. गेल्या १२ वर्षांत सुशासन, सर्वसमावेशक विकास, डिजिटल परिवर्तन, पायाभूत सुविधांचा विस्तार, राष्ट्रीय सुरक्षा आणि जनकल्याणकारी योजनांद्वारे भारताने विकासाची नवी उंची गाठली आहे. विकसित भारत २०४७ च्या संकल्पनेच्या दिशेने देशाची वाटचाल अधिक वेगाने सुरू आहे.

गेल्या १२ वर्षांत प्रधानमंत्र्यांच्या दूरदर्शी नेतृत्वाने "सेवा हीच साधना" या भावनेतून सुशासनाची नवी व्याख्या घडवली आणि विकासाचा लाभ समाजातल्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचवला, असं संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

गेल्या बारा वर्षांत देशातल्या महिला, युवा आणि शेतकऱ्यांना सक्षम करण्यात कोणतीही कसर सोडली नाही, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी

समाजमाध्यमावरल्या पोस्टद्वारे म्हटलं आहे. दीडशे कोटी नागरिकांच्या सदिच्छांच्या बळावर सरकार लोकांचं कल्याण, विकास आणि त्यांचा विश्वास जिंकण्यासाठी समर्पित होऊन काम करत आहे, सरकारच्या अथक प्रयत्नांमुळे भारताला जागतिक पातळीवर एक नवी ओळख प्राप्त झाली आहे, असं प्रधानमंत्री म्हणाले. विकसित भारताचं उद्दिष्ट साध्य करण्यासाठी सरकार सेवा, सुशासन आणि समृद्धीच्या मार्गावर अविरत वाटचाल करत राहील असं प्रधानमंत्र्यांनी अधोरेखित केलं.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या गेल्या १२ वर्षांच्या सत्ताकाळात झालेल्या देशाच्या एकंदर वाटचालीबाबत रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीचे कार्यकारी संचालक अभिराम घड्याळ पाटील यांची मुलाखत आम्ही दोन भागात प्रसारित करत आहोत. या मुलाखतीचा पहिला भाग आज रात्री सव्वा ८ वाजता अस्मिता वाहिनी, newsonair app आणि MUMBAI AIR NEWS या You Tube चॅनेलवर आपल्याला ऐकता येईल. तर दुसरा भाग उद्या याच वेळेला आपण ऐकू शकाल.

**<><><><><>**

देशभरातलं जलसंधारण आणि जलसंपदा व्यवस्थापन मजबूत करण्यासाठी जलशक्ती मंत्रालयामार्फत हाती घेण्यात आलेल्या विविध उपक्रमांचा आणि प्रकल्पांचा आढावा आज उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांनी घेतला. नवी दिल्लीत झालेल्या या बैठकीत त्यांना आंतरराज्यीय नदीजोडणी उपक्रमांसह नदीजोडणी प्रकल्पांसाठी उचलल्या जात असलेल्या उपाययोजना आणि 'नमामि गंगे' व इतर प्रमुख कार्यक्रमांविषयी माहिती देण्यात आली.

**<><><><><>**

देशातून सीमापार मालाची वाहतूक करण्यासाठी तयार केलेल्या संगणकीकृत व्यवस्थापन यंत्रणा, लँड पोर्ट मॅनेजमेंट सिस्टम विनिमय चं उद्घाटन आज केंद्रीय

गृहमंत्री अमित शहा यांच्या हस्ते नवी दिल्ली इथं झालं. या लँडपोर्ट्स मुळे सीमांची सुरक्षितता वाढली असून सीमापार चालणाऱ्या अनधिकृत कारवायांनाही चाप बसेल असा विश्वास शहा यांनी यावेळी व्यक्त केला.

विनिमय मंचावर देशभरातल्या सर्व लँडपोर्टसचा एकत्रित समन्वय साधला जातो.

**<><><><><>**

प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियानाला आज दहा वर्षे पूर्ण होत आहेत. या महत्त्वपूर्ण टप्प्यानिमित्त आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयातर्फे "१० वर्षे – एक दशकाची काळजी" हा राष्ट्रीय कार्यक्रम आजपासून सुरू होत आहे. सुरक्षित गर्भारपण आणि निरोगी मातृत्व सुनिश्चित करण्याच्या उद्देशाने राबवण्यात येणाऱ्या या उपक्रमाचं उद्घाटन केंद्रीय आरोग्यमंत्री जगत प्रकाश नड्डा यांच्या अध्यक्षतेखाली झालं. या योजनेअंतर्गत गर्भवती महिलांना मोफत आणि गुणवत्तापूर्ण आरोग्यसेवा उपलब्ध करून दिल्या जातात. या सेवांचा लाभ अधिकाधिक महिलांपर्यंत पोहोचवण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येणार आहेत. तसंच, वेळेवर प्रसूतीपूर्व तपासणीचं महत्त्व जनतेपर्यंत पोहोचवण्यासाठी व्यापक जनजागृती केली जाणार आहे.

ही योजना म्हणजे प्रत्येक मातेच्या आणि तिच्या गर्भाच्या उज्ज्वल भवितव्याप्रति सरकारची वचनबद्धता असल्याचं केंद्रीय महिला आणि बालकल्याण मंत्री अन्नपूर्णा देवी यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

**<><><><><>**

केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी आज एनटीए अर्थात राष्ट्रीय चाचणी संस्थेच्या नवी दिल्लीतल्या मुख्यालयाला भेट देऊन २१ जूनला होणाऱ्या नीट यूजी फेरपरीक्षेच्या तयारीचा आढावा घेतला. प्रश्नपत्रिका तयार करण्यापासून ते

पुढच्या सर्व प्रक्रियेपर्यंत सर्व कामांची तयारी अतिशय गोपनियता ठेवून केली जात आहे, असं प्रधान यांनी वार्ताहरांशी बोलताना सांगितलं. परीक्षेचे पेपर आणि इतर साहित्य परीक्षा केंद्रांवर व्यवस्थितपणे पोहोचले याची खात्री केली  जात असल्याचं त्यांनी सांगितलं. परीक्षेच्या प्रक्रियेत कोणतीही त्रुटी राहू नये यासाठी केंद्र सरकार राज्य सरकारांशी समन्वय साधत आहे, सायबर सुरक्षेसाठी सीबीआय आणि आयबी या संस्था  काळजी घेत आहेत, असं प्रधान यांनी सांगितलं.

**<><><><><>**

राज्यसभा निवडणुकीसाठी मध्य_प्रदेशातून अर्ज भरलेल्या काँग्रेस उमेदवार मीनाक्षी नटराजन यांचा अर्ज बाद झाला आहे. न्यायालयातल्या खटल्यांची माहिती लपवल्याच्या कारणास्तव निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी हा अर्ज बाद ठरवला आहे.

विनयभंग आणि खुनाची धमकी देण्याचा आरोप असलेल्या व्यक्तीला मदत केल्याचा आरोप करुन एका व्यक्तीने नटराजन यांच्याविरोधात न्यायालयात तक्रार दाखल केली आहे. मात्र याप्रकरणी न्यायालयात खटला दाखल झालेला नसून केवळ न्यायालयाकडून नटराजन यांना केवळ नोटीस मिळाल्याचा दावा काँग्रेसनं केला आहे. तर हा राजकीय हेतूनं ही तक्रार दाखल झाल्याचा दावा नटराजन यांनी केला आहे.

**<><><><><>**

राजस्थानात जयपूर इथं फटाक्यांच्या एका बेकायदेशीर गोदामात झालेल्या स्फोटामुळे लागलेल्या आगीत सात जणांचा मृत्यू झाला. खोह नागोरियन या रहिवासी भागात हे गोदाम आहे. या सात जणांपैकी पाच जणांची ओळख पटली आहे. मुख्यमंत्री भजनलाल शर्मा आणि काँग्रेस नेते अशोक गेहलोत यांनी या दुर्घटनेबद्दल शोक व्यक्त केला आहे. जिल्हा प्रशासन आणि संबंधित अधिकाऱ्यांना अत्यंत तत्परतेने मदत आणि बचाव कार्य राबवण्याचे, जखमींना सर्वोत्तम वैद्यकीय

सुविधा मिळवून देण्याचे आणि बाधित कुटुंबांना शक्य ती सर्व मदत पुरवण्याचे आदेश मुख्यमंत्री शर्मा यांनी दिले आहेत.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज कुवैतचे अमीर शेख मशाल अल्- अहमद अल्- जबर अल् सबाह यांच्याशी दूरध्वनीवरुन चर्चा केली. पश्चिम आशियातल्या भूराजकीय तणावाबाबत आणि सुरक्षा स्थितीबाबत दोन्ही नेत्यांनी विचार विनिमय केला. प्रधानमंत्र्यांनी कुवेतवर झालेल्या हल्ल्यांचा निषेध केला आणि संवादाच्या मार्गाने तणाव कमी करण्याची आवश्यकता अधोरेखित केली. कुवेतमधल्या भारतीय समुदायाच्या सुरक्षिततेकडे व्यक्तिशः लक्ष दिल्याबद्दल मोदी यांनी अमीरांचे आभार मानले.

**<><><><><>**

पाकव्याप्त काश्मीरमधे आंदोलक आणि सुरक्षा दल यांच्यात झालेल्या संघर्षात तीस जणांचा मृत्यू झाला असून दोनशेहून अधिक जण जखमी झाले आहेत. जॉईंट आवामी ऍक्शन कमिटी या नागरी हक्कासाठी काम करणाऱ्या संस्थेवर बंदी घातल्यामुळे या आंदोलनाला तोंड फुटलं. रावलकोट आणि मुझ्झफराबाद इथं आंदोलक आणि सुरक्षा दल यांच्यात संघर्ष झडल्यानंतर सरकारने समाजमाध्यमांवर तात्पुरती  बंदी आणली, या पार्श्वभूमीवर नागरिकांनी बंद पुकारला आहे. आंदोलनाची धग कोटली आणि भिमबर या शहरांपर्यंतही पोचली असून पाकिस्तानविरोधी आंदोलनात हजारो लोक रस्त्यावर  उतरत आहेत.

सिविल सोसायटीवर पाकिस्तान सरकारने केलेल्या कारवाईचा जगभरातून निषेध केला जात आहे. पाकव्याप्त काश्मीरमधे झालेल्या अटक, समाजमाध्यमावरली बंदी याबाबत ब्रिटनच्या संसदेतल्या ५० सदस्यांनी ब्रिटनच्या परराष्ट्र मंत्र्यांना पत्र लिहून चिंता व्यक्त केली आहे.

पाकव्याप्त काश्मीरमधे सुरक्षा दलाच्या कारवाईत झालेल्या आंदोलकांच्या मृत्यूची भारताच्या परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाने दखल घेतली आहे. पाकिस्तानच्या गैरकृत्यासाठी आंतरराष्ट्रीय समुदाय त्यांना जबाबदार धरेल अशी आशा भारताने व्यक्त केली आहे.

**<><><><><>**

इराण आणि इसराएलने एकमेकांवरचे हल्ले थांबवायचं ठरवलं आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांनी ट्रूथ सोशल या समाजमाध्यम मंचावर याची घोषणा केली. दोन्ही देश शस्त्रसंधी करुन शांतिस्थापनेच्या दिशेने अंतिम तोडगा मिळवण्यासाठी प्रयत्नशील असल्याचं त्यांनी म्हटलं होतं.

इसराएलचे प्रधानमंत्री बिन्यामिन नेतान्याहू यांनी देखील इसराएली सैन्याने इराणविरुद्ध हल्ले थांबवले असल्याचं म्हटलं आहे, मात्र इराणने पुन्हा आक्रमणाची आगळीक केली तर इसराएल सडेतोड जबाब देईल असं त्यांनी स्पष्ट केलं आहे.

**<><><><><>**

सहज आर्थिक परतावा देणाऱ्या एका गुंतवणूक प्लॅटफॉर्मला केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी पाठिंबा दिल्याचा दावा करणारा व्हिडीओ खोटा असल्याचं सरकारने स्पष्ट केलं आहे. पत्र सूचना कार्यालयाच्या तथ्यता पडताळणी विभागाने याबाबतची माहिती दिली आहे. हा व्हिडीओ एआयच्या मदतीने तयार करण्यात आला असून बनावट आणि दिशाभूल करणारा आहे. अशा व्हिडीओंचा वापर करून फसवणूक होऊ शकते, त्यामुळे त्यांवर विश्वास न ठेवण्याचं आवाहन पीआयबीने केलं आहे.

**<><><><><>**

नववीच्या विद्यार्थ्यांना तीन भाषा अनिवार्य करण्याच्या सीबीएसईच्या निर्णयाला आव्हान देणारी याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल झाली आहे. राज्यसरकारमधल्या माजी मंत्री फौजिया खान यांनी ही याचिका दाखल केली आहे. तीन भाषा अनिवार्य करण्याचा सीबीएसईचा निर्णय राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०

चं उल्लंघन असून दाक्षिणात्य राज्यांमधे हिंदी आणि उत्तरेकडच्या राज्यांमधे संस्कृत लादणं हे याचं उद्दिष्ट असल्याचा आरोप खान यांनी केला. एकीकडे सीबीएसई शिक्षकांचा तुटवडा असल्याचं सांगत आहे, मग तीन भाषा अनिवार्य करण्याचा निर्णय का घेत आहे, असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला.

**//<><><><><>//**